# माजाचे एकत्रीकरण

**डॉ. चैतन्य पावशे**

पशुजनन, मादीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग

स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशु विज्ञान संस्था, अकोला.

सद्यस्थीतीत बहुतांश पशुपालकांकडे ४-५ गाई असतात तसेच ९०-१०० गाई असलेल्या गोठ्यांची संख्या ही वाढत चालली आहे. परंतु गाय विल्यानंतर वेगवेगळ्या कारणामुळे योग्य काळात माजावर येत नाहीत किंवा माज योग्य वेळेत ओळखता येत नाही. कधी माजानंतर स्त्रीबीज बीजांडतून उशिरा बाहेर पडते किंवा न बाहेर पडल्यामुळे गर्भधारणा होत नाही. अशामुळे गाई पुन्हा माजावर येतात. तसेच वर्षाच्या प्रत्येक महिन्यात गाई नियमीत माजावर आणून गाभण राहील्यास वर्षभर सारख्याच प्रमाणात ढुध पुरवठा करणे शक्य होईल हे सर्व करण्यासाठी माजाचे एकत्रीकरण करणे अत्यंत महत्वाचे आहे.

माजाचे एकत्रीकरण किंवा समन्वय म्हणजेच कळपातील किंवा गोठ्यातील एका पेक्षा जास्त गाई संप्रेरक देवून एकाच वेळेस माजावर आणणे त्यानंतर कृत्रीम रेतनाने फळवणे किंवा माजाच्या बाह्य लक्षणाशिवाय विशिष्ठ ठरविलेल्या वेळी कृत्रीम रेतन करणे.

**माज एकत्रीकरणाचे फायदे**

१) माजाच्या एकत्रीकरणामुळे गाईंना कृत्रीम रेतन करण्याचे वेळापत्रक मर्जीनुसार ठरविता येईल तसेच माजाचे बाह्य लक्षणे न पाहता एकाचवेळी अनेक गाईंना निश्चितवेळी कृत्रीमरेतनाद्वारे फळविता येईल.

२) एकाचवेळी अनेक गाईला माजाचे एकत्रीकरणाचे उपचार करता येतील व त्यामूळे कृत्रीम रेतन पध्दतीचा वापर सोयीस्कर होईल.

३) गाईच्या स्थितीप्रमाणे खाद्याचे चांगल्या प्रकारे नियोजन करता येईल.

४) विण्याचे वेळी गाईकडे लक्ष पुरवणे सोयीचे होईल व त्यामुळे वासरांचे जन्मत: मुत्यूचे प्रमाण कमी करता येईल.

५) माज एकत्रीकरणामूळे स्त्रीबीजांना बिजकोषातुन सुटण्याची वेळ ठरविता येईल तसेच बाह्यलक्षणाशिवाय निश्चीतवेळी कृत्रीम रेतन करता येईल.

६) वर्षभर गाईच्या प्रजननाचे वेळापत्रक ठरविता येईल व तसेच पशुरोग नियत्रंणासाठी पध्दतशीर फायदा होईल.

अशाप्रकारे माजाचे एकत्रीकरण हे तंत्रज्ञान पशुपालकांसाठी अत्यंत फायद्याचे आहे. यामुळे ढुधाळू गाईपासुन जास्तीची वेते मिळू शकतात व भरपूर ढुग्धोत्पादन मिळते. माजाचे एकत्रीकरण करण्यासाठी येणारा खर्च प्रति गाय रु. ५०० इतका असून मिळणारा फायदा अनेकपटीने जास्त आहे. माजाचे एकत्रीकरण करण्यासाठी नजीकच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडून ज्या गाईचे माजाचे एकत्रीकरण करावयाचे आहे अशा सर्व गाईच्या जननेंद्रिय व ऋतुचक्राची योग्य स्थितीची माहिती करून घ्यावी व पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनाखाली संप्रेरकाचे औषध देऊन माजाचे एकत्रीकरण करावे. पशुपालकांनी या तंत्राचा वापर करून गाईची प्रजनक्षमता सुयोग्य ठेवली तर दुग्ध व्यवसाय आर्थिकदृष्ट्या फायदेशीर व भरभराटीचा होईल.